# धुळे महानगरपालिका,धुळे
## अग्निशमन दाखला

जा.क्र/धुमपा/अग्नि.वि/ ११७/२०२५-२६

दाखला देण्यात येते की, **डॉ.श्री राजेश मगनलाल शहा** .
पत्ता : **आग्रा रोड देवपूर धुळे.**

याठिकाणी : **कै.दादासाहेब छगनलाल अजमेरा आयुर्वेद रुग्णालय(शतायू हॉस्पीटल)** हया प्रयोजनासाठी मागितलेल्या परवानगी नुसार सार्वजनिक दृष्टीकोनातुन सदर ठिकाणी अग्नि प्रतिबंधक उपाययोजन सुस्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

खालील निम्नलिखित अटी व शर्तीवर दाखला देण्यात येत आहे.

***अटी व शर्ती***

१.सदर दाखला हा मनपाने प्रमाणित केलेल्या नकाशा बरहुकुम बांधकामासाठी दिलेला आहे. मंजुर बांधकामा व्यतिरिक्त वाढीव बांधकाम व सामासिक अंतरातील बांधकामास सदर दाखला लागु होणार नाही.
२.दाखला घेतले नंतर सदर इमारतीच्या बांधकाम वापरात बदल करण्यात आल्यास व वाढीव बांधकाम केल्यास असा केलेला बदल मनपा नगररचना विभागा मार्फत मंजुर करुन घ्यावा लागेल तसेच केलेल्या बदलानुसार अग्निप्रतिबंधक विमोचक उपाय योजना मध्ये नियमानुसार फेरबदल करणे दाखला धारकांवर बंधनकारक राहील.
३.सदरच्या ठिकाणी इतर शिघ्र ज्वालाही पदार्थ / द्रव्याचा साठा करण्यात येवु नये.
४.सदर जागेतील विद्युत वायरी आ.एस.आय. मटेरिअलमध्ये केले असावी. विद्युत वायरींगचे उघडे जोड ठेवु नये.तसेच वापरात असलेली विद्युत साधने व उपकरणे स्पार्क प्रुफ असावी.
५.सदर जागेत पोटमाळे नसावे तसेच यापूर्वी मनपाच्या मंजुरीन पोटमाळा केलेला असल्यास त्याचा मानवी व इतर कामांसाठी गैरवापर करु नये.
६.रस्त्यात / जिना / पॅसेज / गेट या मार्गात कोणतेही अडथळे असु नये. हे मार्ग नेहमी मोकळे ठेवावे.
७.सदरच्या ठिकाणी असलेली अग्निप्रतिबंधक व विमोचक उपाय योजना/ साधन सामुग्री आगीच्या वेळी कशी वापरावी याची माहिती परवानाधारक व तेथे काम करणारे कर्मचारी यांना असणे आवश्यक आहे.
८.सदर ठिकाणी खालील अग्निविमोचक साहित्य सुस्थितीत ठेवावे.
**अ) फायर एक्सटिंग्युशर.**
**ब) फायर अलार्म सिस्टम फायर स्मोक डिटेक्टर सिस्टम .**
**क) फायर हायड्रन सिस्टम.**
९. धुम्रपान निषेध फलक दर्शनी भागात लावावा.
१०.अग्निशमन दलाचे अधिकारी सदर जागेच्या वार्षिक तपासणी साठी भेटी देतील अशा वेळी अग्निप्रतिबंधक व विमोचक उपाय योजना सुस्थितीत आढळल्यास त्याबाबत दाखल्यावर त्वरीत नोंद केली जाईल.अशी नोंद असल्या शिवाय मनपा विभागाकडील परवाना नुतनीकरण केला जाणार नाही व परवाना दिला जाणार नाही.
११. सदर ठिकाणी असलेली अग्निप्रतिबंधक उपाय योजना सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी आपली असुन त्याबाबत तपासणीचे अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेले आहेत.महाराष्ट्र आग प्रतिबंधक अधिनियम २००६, नियम २००९ च्या अधिन राहून सदरचा दाखला देण्यात येत आहे. उक्त अधिनियमाच्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करणेत येईल.

हा दाखला दिनांक : **२५/०७/२०२५** ते दिनांक : **२४/०७/२०२६** पावेतो अंमलात राहील.
धुळे.
दिनांक : **१८/०८/२०२५**

धुळे महानगरपालिका, धुळे स्थापना ता. ३०/५/०३ अग्निशमन व आपात्कालीन सेवा

सहा.अग्निशमन अधिकारी
धुळे महानगरपालिका धुळे
अग्निशमन व आपात्कालीन सेवा